स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक** 22–09–2016 रोजी **दुपारी** 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 4. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 6. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 7. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 8. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 9. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 12. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 13. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 14. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 15. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 16. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 528:— {लोककर्म विभाग} नागपूर शहरातील सिमेंट कॉंक्रिट रोड फेज – II अंतर्गत पॅकेज –21 अंतर्गातील रस्ता क्र. 5 ईस्ट हायकोर्ट रोड – हायकोर्ट कॉर्नर ते भोले पेट्रोल पंप ते अलंकार चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता तयार करण्याकरिता मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. ची 13.95 टक्के कमी दराची रू.

15,55,95,324/— रकमेची निम्नतम निविदा प्राप्त झाली होती. परंतु मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे विरूध्द ACB ने VIDC चे कामाबाबतचे FIR दाखल केल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याने मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. चे कामाबाबतचे स्विकृतीपत्र देण्यात आले नव्हते तसेच legal opinion करीता मनपाचे कायदेतज्ञाकडे पाठविण्यात आली.

दरम्यान स्थायी समिती ठराव क्र. 390 दि. 06.08.2016 अन्वयेसमिती गठित करून इतर कॉंक्रिट रोडचे तत्सम प्रलंबित प्रकरणात समितीने तांत्रिक व कायदेशिर तसेच निविदेतील अटी व शर्ती याची पुर्तता आहे किंवा नाहीयाची तपासणी करून अशी प्रलंबित प्रकरणे अहवालासह स्थायी समिती समक्ष सादर करण्याचे निर्देशीत केले. त्यानुसार समितीने या प्रकरणी मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे द्वारा करण्यात आलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली व या प्रकरणी VIDC द्वारे मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्याविरूध्द कोणतीही कार्यवाही अद्यापपावेतो केलेली नाही. असे समितीने अहवालात नमुद केलेले आहे. करीता मनपास प्राप्त पॅकेज — 21 मे. डी. ठक्कर कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची निम्नतम निविदा निर्णयास्तव स्थायी समितीस सादर करण्याचे समितीने शिफारस केलेली आहे. करीता प्राकलनिय दरापेक्षा 13.95 टक्के कमी दराची रू. 15,55,95,324/— निविदा मंजुर करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 529</u>:— नागपूर शहराकरिता सिमेंट कॉक्रीट रोड फेज —II , {का. अभि. प्रकल्प} अंतर्गत, पैकेज — 13 अंतर्गत रस्ता क्र. 16 रेल्वे फिडर रोड, नाका क्र. 13 ते बडकस चौक ते लाकडी पुल ते झेंडा चौक, रस्ता क्र. 49 गणेश चौक ते चित्रा टॉकीस इत्यादी रस्त्यांसाठी सिमेंट कॉक्रीट रोड तयार करण्याकरीता प्राकलनिय राशी रू. 15,25,50,080 /— ची निविदा बोलावण्यात आली असता एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या पात्र निविदापैकी मे. जे.पी.एस.आर.के. इनफ्रा यांची प्राकलनिय दरापेक्षा 10.02 % कमी दराची रू. 13,72,64,557/— रकमेची असून यास दि. 14/9/2016 मा. निगम आयुक्त यांनी निविदा मंजुरी करिता शिफारस केलेली असून निम्नतम दराची मे. जे.पी.एस.आर.के. इनफ्रा (जे.व्ही) यांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 530</u>:— नागपूर शहराकरिता सिमेंट कॉक्रीट रोड फेज —II , {का.अभि. प्रकल्प} अंतर्गत, पैकेज — 14 अंतर्गत रस्ता क्र.51 भवसार चौक ते तिन नल चौक, रोड क्र. 52 कॉटन मार्केट रोड, मौलाना नातिक चौक ते कॉटन मार्केट चौक रस्त्यांसाठी सिमेंट कॉक्रीट रोड तयार करण्याकरीता प्राकलनिय राशी रू. 13,78,41,670/— ची निविदा बोलावण्यात आली असता एकूण 04 निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या पात्र निविदापैकी मे. अश्विनी इनफ्रा डेव्हलपमेन्ट प्रा.ली. यांची प्राकलनिय दरापेक्षा 6.66 % कमी दराची रू. 12,86,61,415/— रकमेची असून यास दि. 14/9/2016 मा. निगम आयुक्त यांनी निविदा मंजुरी करिता शिफारस केलेली असून निम्नतम दराची मे. अश्विनी इनफ्रा डेव्हलपमेन्ट प्रा.ली.यांची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 531</u>:– प्रभाग क्र. 64–ब अंतर्गत दुर्गा नगर येथील परिसरात
{लोककर्म झोन 03} सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. ४९,९९,७८५/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 532</u>:– प्रभाग क्र. 47 अंतर्गत गणेश नगर सुदर्शन धाम येथील
{लोककर्म झोन 05} अतिरिक्त स्थापत्य कामे व फॉऊन्टेनचे कामे करण्याच्या कामास्तव रू. ३०,९१,५७८/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 533</u>:– प्रभाग क्र. 65–अ अंतर्गत वेस्ट बालाजी नगर येथील
{लोककर्म झोन 03} श्री. पुरानीक यांच्या घराजवळील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रू. २७७१४१०/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 534</u>:– प्रभाग क्र. ४८–अ रेशिमबाग येथील प्लॉट नं.
{लोककर्म झोन 03} एन–१३९, (शेंदुरनीकर ते भिसेकर आणि श्री नरड ते सोनभद्रे) रेशिमबाग येथे डांबरीकरणाचे व प्रभाग क्र. ४८–ब रेशिमबाग येथील शारदा मंदीर मटटीपुरा ते तलंगीपुरा (गेव आवारी मार्ग) सिरसपेठ येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनीय दराची रू. २९,९९,७३१/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 535</u>:– प्रभाग क्र. ७२ क अंतर्गत पखिड्डे लेआऊट व
{लोककर्म झोन 01} नितनवरे लेआऊट, जयताळा येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव तयार केलेल्या रू. २८,४८,५३७/– (अक्षरी अठ्ठावीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार पाचशे सदतीस फक्त) रक्कमेच्या प्राकलनास पद क्र. A2200133802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 536</u>:– प्रभाग क्र. ७२ क अंतर्गत भांगे लेआऊट, जयताळा
{लोककर्म झोन 01} येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या तयार केलेल्या रू. २९,५०,१४०/– (अक्षरी एकोनतीस लक्ष पन्नास हजार एकशे चाळीस फक्त) रक्कमेच्या प्राकलनास पद क्र. A2200133802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 537</u>:– प्रभाग क्र. ७२ क अंतर्गत प्रज्ञा नगर व झाडे
{लोककर्म झोन 01} लेआऊट येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव तयार केलेल्या रू. २९,९०,७३३/– (अक्षरी एकोनतीस लक्ष नव्वद हजार सातशे तेहत्तीस फक्त) रक्कमेच्या प्राकलनास पद क्र. A2200133802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 538</u>:– प्रभाग क्र. 26 ब येथिल वुमन्स होम नॉर्थ अंबाझरी
{लोककर्म झोन 04} रोड मागील नाग नदीच्या सुरक्षा भित तयार करण्यास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 27,61,130/– रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. (A43901370812) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 539</u>:– नागपूर शहरात विविध ठिकाणी ''महिला स्वच्छता गृहासोबत'',
{स्लम विभाग} पुरूषांकरिता मुतारीची व्यवस्था करण्याबाबतचा मे. रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य यांच्या प्रस्तावावर विचार करण्याचा प्रश्न समितीनी विचारात घेवुन,

मा. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. 98/2011 मधील निर्देशानुसार नागपूर शहरात विविध ठिकाणी नमुद अटी व शर्तीवर मे. रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य या संस्थेस त्यांनी मागणी केलेल्या एकुण 50 स्थळांऐवजी प्रथम टप्प्यात 25 स्थळे मंजुर करण्यात येवुन प्रस्तावित यादीपैकी सोयीस्कर अशा 5 स्थळांवर प्रायोगीक तत्वावर स्वच्छतागृहे उभारण्यास व त्यांचे पुढील 3 वर्षाकरिता संचालन आणि देखभाल करण्यास तसेच या 5 स्थळांवरील काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरित 20 स्थळांपैकी 5–5 स्थळांच्या 4 टप्प्यामध्ये सुयोग्य स्थळांची प्राथम्यानुसार निवड करून संस्थेस उपलब्ध करून देण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र. 472, दि. 12.01.2016 अन्वये यापूर्वी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम चरणात 5 ठिकाणी महिला स्वच्छतागृहे उभारण्यात आली असुन, ती महिलांच्या सेवेत सुरू करण्यात आलेली आहेत. बहुतांश ठिकाणी मा. नगरसेवकांनी तसेच नागरिकांनी ''महिला स्वच्छतागृहासोबत'' पुरूषांकरिता मुत्रीघराची व्यवस्था करावी म्हणुन सुचना दिल्या आहेत. याकरीता कमीत कमी 8′ x 16′ मापाच्या जागेची आवश्यकता राहील.

तरी रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य यांना यापूर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. 472, दि. 12.01.2016 च्या अटी व शर्तीवर व दि. 24 मे 2016 च्या सामजस्य कराराच्या अटी व शर्तीवर त्यांचे स्वखर्चानेच प्रथम टप्प्यातील उर्वरित 20 ठिकाणी ''महिला स्वच्छतागृहासोबत पुरूष मुत्रीघर'' उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 540</u>:– म.न.पा. मालकीचे सतरंजीपुरा झोन क्र. 7 मस्कासाथ चुना
{बाजार विभाग} ओळी या ठिकाणी तळ माळ्यावर एकुण 10 दुकानांची तसेच पहिल्या माळ्यावर 4 दुकानांची निर्मीती सन 1993–94 मध्ये म.न.पा. तर्फे पुर्ण करण्यात आलेली असुन, हि दुकाने अग्रिम जमा राशी योजने अंतर्गत आवंटन करण्याकरीता वर्तमानपत्रात दि. 10/09/1992 रोजी जाहिरात देण्यात आलेली होती. जाहिराती नुसार खालील 10 गाळे धारकांना आवंटन करण्यात आले. उक्त दुकानांना A, B आणि C या तिन कॅडर मध्ये विभागणी करण्यात आली होती. 1) A कॅडर मधील एकुण दुकाने 3 दुकानांचे क्षेत्रफळ 9.28 चौ.मी. मासीक भाडा रू. 930/– 2) B कॅडर मधील एकुण दुकाने 3 दुकानांचे क्षेत्रफळ 19.22 चौ.मी. मासीक भाडा रू. 1950/– 3) C कॅडर मधील एकुण दुकाने 4 दुकानांचे क्षेत्रफळ 2.36 चौ.मी. मासीक भाडा रू. 240/– असुन तळ माळ्यातील 6 दुकानांचे कब्जा चिठ्ठी आणि आवंटन दि. 1/10/1994 पासुन करण्यात आलेले आहे.

वरील 10 दुकाने अग्रिम जमा राशी योजनेच्या तहत म.न.पा. तर्फे आवंटन करण्यात आलेली होती. त्यांची नावे खालील प्रमाणे.

| अ. क्र. | दुकानाचा प्रकार व क्र. | दुकानाचे क्षेत्रफळ | आवंटन धारकाचेनांव | म.न.पा.कडे डिपॉझीट केलेली रक्कम | पवती क्र. | दिनांक | मासीकभाडा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ए/1 | 9.28 | श्री. ओमप्रकाशजी. बजाज | 30,000/—<br>20,000/— | 33/2<br>चे.नं. 01925 | 15/09/92<br>8/04/93 | 930/— | |
| 2 | ए/2 | 9.28 | श्री. मगामल उकामल फुलवानी | 30,000/—<br>20,000/— | 29/2<br>चे.नं. 101432 | 14/09/92<br>17/03/93 | 930/— | |
| 3 | ए/3 | 9.28 | श्री. शंकरलाल म. कल्यानी | 30,000/—<br>20,000/— | 30/2<br>चे.नं. 023218 | 14/09/92<br>10/03/93 | 930/— | |
| 4 | बी/4 | 19.22 | श्री. सुरेशजी. बजाज | 60,000/—<br>40,000/— | 34/2<br>चे.नं. 01924 | 15/09/92<br>08/04/93 | 1950/— | |
| 5 | बी/5 | 19.22 | श्री. हरीष आर. केवलरामानी | 60,000/—<br>40,000/— | 139281<br>120163 | 14/09/92<br>26/03/93 | 1950/— | |
| 6 | बी/6 | 19.22 | श्री. मोहन केवलरामानी | 60,000/—<br>40,000/— | 139285<br>120164 | 15/09/92<br>26/03/93 | 1950/— | |
| 7 | सी/7 | 2.36 | श्री. जयप्रकाश पी. वासानी | 12,000/— | 36/2 | 15/09/92 | 240/— | |
| 8 | सी/8 | 2.36 | श्री. रमेश नंदलाल अडवाणी | 8,000/—<br>4,000/— | 37/2<br>चे.नं. 212028 | 15/09/92<br>09/03/93 | 240/— | |
| 9 | सी/9 | 2.36 | श्री. रमेश हासनदास किशनानी | 8,000/—<br>4,000/— | 32/2<br>चे.नं. 135115 | 15/09/92<br>07/04/93 | 240/— | |
| 10 | सी/10 | 2.36 | श्री. संजय मोटुमल कुकरेजा | 8,000/—<br>4,000/— | 38/2<br>चे.नं. 03892 | 15/09/92<br>07/01/93 | 240/— | |

वरील तळमाळ्यातील 10 दुकाने वगळल्यास पहिल्या माळ्यावरील 4 दुकाने अजुनही Under Construction आहेत. वरील पैकी तळमाळ्यावरील 8 दुकानांचे कब्जा चिठ्ठी आणि आवंटन दि. 1/10/1994 पासुन करण्यात आलेले असुन तळमाळ्यातील 2 दुकानांची कब्जा चिठ्ठी झालेली नसल्याचे नस्तीवरून दिसुन येते. उक्त मस्कासाथ चुना ओळी या ठिकाणी C कॅडर मधील 4 दुकानांना शटर न लावल्या गेल्यामुळे त्या ठिकाणी व्यवसाय सुरू नाही. तसेच 6 दुकानांना शटर लागलेले असुन, मौका चौकशी केली असता, सहाही दुकाने बंद स्थितीत आढळुन आली.

उक्त सहा दुकानांपैकी B कॅडर मधील 3 दुकाने दुकान क्र. B/4, B/5 व B/6 श्री. सुरेश गोकुलदास बजाज, श्री. हरिष आर. केवलरामानी आणि श्री. मोहनबी. केवलरामानी यांना प्रत्येकी 19.22 चौ.मी. क्षेत्रफळाचे गाळे अग्रिम जमा राशी योजने मध्ये रू. 1,00,000/— मध्ये आवंटन करण्यात आलेले असुन,त्यांनी रकमेचा भरणा तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे केलेला आहे. व त्यांना करारनामा करून घेण्याकरीता क्रमशाः दि. 22/09/1994 ला बाजार विभागातर्फे पत्र तामील करण्यात आलेले होते.

त्याच प्रमाणे मस्कासाथ चुना ओळ येथील A कॅडर मधील 3 दुकानां पैकी दुकान क्र A/1 श्री. ओमप्रकाश गोकुलदास बजाज, दुकान क्र. A/2 श्री. मगामल उकामल फुलवानी आणि दुकान क्र. A/3 श्री. शंकरलाल मोटुमल कल्यानी यांना दि. 1/10/1994 रोजी कब्जा चिठ्ठी तथा दुकानाचे आवंटन करण्यात आलेले होते. या तिन्ही दुकानांचा मासीक भाडा दि. 1/10/1994 पासुन रू. 930/— असुन, दुकान क्र. A/1 वर दि. 1 आक्टोंबर 1994 पासुन तर दि. 31 मार्च 2015 पर्यंत एकुण रू. 4,15,744/— परवाना शुल्काची थकीत रक्कम असुन, तसेच सेवाकर रू. 22,029/—आणि एकुण रू. 4,37,773/—थकीत आहेत. तसेच दुकान क्र. A/2 आणि दुकान क्र. A/3 यावर देखील आक्टोंबर 1994 ते मार्च 2015 पर्यंत थकीत परवाना शुल्क आणि सेवाकराची दुकान क्र. A/1 प्रमाणेच रू. 4,37,773/—थकीत असुन तिन्ही दुकानांची परवाना शुल्का च्या थकीत रकमेची गोळाबेरीज केल्यास, रू. 13,13,319/—परवाना शुल्काची थकीत रक्कम उक्त तिन्ही दुकानदारांकडे आज स्थितीत आहे. (वरिल पैकी श्री.

ओमप्रकाश बजाज यांनी दुकान क्र. A/1 करीता दि. 27/02/2015 रोजी म.न.पा. कडे रू. 50,000/–चा भरणा केलेला आहे.)

त्याच प्रमाणे मस्कासाथ चुनाओळ येथील दुकान क्र. C/7 श्री. जयप्रकाश पोपटलाल वसानी, दुकान क्र. C/8 श्री. रमेशनंदलाल अडवाणी, दुकान क्र. C/9 श्री. रमेश हासनदास किशनानी आणि दुकान क्र. C/10 श्री. संजय मोटुमल कुकरेजा यांचा दुकानाचा क्षेत्रफळ 2.36 चौ.मी. असुन त्यांचा मासीक भाडा दि. 1/10/1994 पासुन रू. 240/–प्रत्येक दुकानांचा भाडा होता. उक्त चारही दुकाने दि. 1/10/1994 रोजी आवंटन करण्यात आलेले होते परंतु कब्जा चिठ्ठी झाली नसल्याचे नस्तीवरून दिसुन येते.

उक्त आवंटन धारकांकडे सन 1/10/1994 पासुन दि. 31 मार्च 2015 पर्यंत एकुण परवाने शुल्क रू. 1,25,196/–तसेच सेवाकर रू. 8,133/– असे एकुण रू. 1,33,329/– म.न.पा.ला घेणे असुन, C ब्लॉक मधील चारही आवंटन धारकांची रू. 1,33,329/– या प्रमाणे गोळाबेरीज केल्यास रू. 5,33,316/–परवाना शुल्काची थकीत रक्कम असल्याचे दिसुन येईल. (A ब्लॉक मधील 3 दुकानदारा वरील थकीत परवानेशुल्काची रक्कम रू. 13,13,319/– आणि C ब्लॉक मधील एकुण 4 दुकानदारांकडे असलेली थकीत रक्क्म रू. 5,33,316/– असे एकुण रू. 18,46,635/–)

सदरहु मस्कासाथ चुना ओळ या ठिकाणी संडास, गंदगी, कचरा तथामुत्री घर असल्या कारणाने तसेच साफसफाई व्यवस्थातसेच कचऱ्याचा ढिगारा व गंदगी इत्यादी बाबींचा नित्य/दर–रोजकचऱ्याचे निस्तारण तसेच साफसफाईची व्यवस्था होत नसल्यामुळे, A ब्लॉक मधील उक्त तिन्ही गाळे धारकांनी सन 1994 पासुन व्यवसाय सुरू केलेला नव्हता.

उक्त B कॅडर मधील दुकानांना दि. 1/10/1994 पासुन प्रत्येकी प्रतिमहा रू. 1950/– भाडा तथा वार्षीक रू. 23,400/–भाडा आकारण्यात आलेला होता. यानंतर उक्त दुकानदारांची प्रत्येक तिन वर्षानंतर परवाना शुल्कात 20 %भाडे वाढ होणार होती. या नुसार सन 2015–16 पावेतो परवाना शुल्क प्रति दुकान प्रति महा रू. 5,822/– तसेच वार्षीक रू. 69,864/– येत आहे. उक्त दुकानदारा कडुन सन 1994 ते सप्टेंबर 2015 पावेतो प्रत्येकी एकुण रू. 9,06,696/–आणि सेवाकर रू. 55,599/– असे एकुण प्रत्येक दुकानदारां कडुन **रू. 9,62,295/– ( × 3 = रू. 28,86,885/– )** म.न.पा.स घेणे आहे. याबाबत अर्जदारांनी मा. सभापती, स्थायी समिती, म.न.पा. यांचे कडे दि. 14/09/2015 रोजी निवेदन सादर केलेले आहे. व त्यांनी लवकरात लवकर आकारणी योग्य असलेले दुकान भाडे प्रस्तावित करावे असे विभागास निर्देशीत केलेले आहे. निर्देशीत केल्याप्रमाणे भाडे कमी करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेऊन,

**विषय** :– या संदर्भात अर्जदार श्री. सुरेश गोकुलदास बजाज, श्री. हरिष आर. केवलरामानी आणि श्री. मोहन बी. केवलरामानी B ब्लॉक मधील यांनी दुकान क्र. 4, 5 व 6 बाबत दि. 6/10/2003, दि. 10/12/2013 आणि दि. 19/06/2015 रोजी अर्ज सादर करून सन 2013 पासुन उक्त दुकानावर भाडे आकारण्याबाबत म.न.पा.स विनंती केलेली आहे. अर्जदार श्री. बजाज, श्री. हरीष केवलरामानी आणि श्री. मोहन केवलरामानी यांनी क्रमशः दि. 27/02/2015 रोजी प्रत्येकी रू. 50,000/–चा भरणा म.न.पा. कडे केलेला आहे.

उक्त B ब्लॉक मधील दुकानदारां कडुन प्रत्येकी सन 1994 ते सप्टेंबर 2015 पावेतो एकुण रू. 9,06,696/– आणि सेवाकर रू. 55,599/–असे एकुण रू. 9,62,295/– म.न.पा.स घेणे आहे. आणि त्यांचे निवेदनाच्या अनुषंगाने सन 2013 पासुन अर्थात दि. 1 आक्टोंबर 2013 ते 30 सप्टेंबर 2015 या कालावधी करीता मासीक रू. 5,822/–प्रमाणे वार्षीक भाडे रू. 69,864/– या नुसार आक्टोंबर 2014 ते सप्टेंबर 2015 या कालावधी करीता प्रत्येकी मासीक रू. 5,822/– प्रमाणे वार्षीक भाडे रू. 69,864/–असे एकुण मासीक रू. 1,39,728/–आणि सेवाकर रू. 17,270/–असे एकुण रू. 1,56,998/–निघत आहे.

उक्त तिन्ही अर्जदारां कडुन म.न.पा.ला घेणे असलेले सन 1994 ते सप्टेंबर 2015 पर्यंत प्रत्येकी रू. 9,62,295/– या मधुन रू. 1,56,998/–वजा केल्यास रू. 8,05,297/–× 3 (तिन्ही अर्जदारांकडुन) = **रू. 24,15,891/–**चे नुकसान म.न.पा.स होण्याची शक्यता आहे.

सदर प्रकरणात वरिलकालावधी करीता म.न.पा.स घेणे असलेले हिशोब सुचविलेले असुन B कॅडर मधील प्रत्येकी तिन दुकानदारांकडुन त्यांचे निवेदनानुसार रू. 1,56,996/– या प्रमाणे **रू. 4,70,988/–** म.न.पा.स प्राप्त होईल. तर एकुण **रू. 24,15,891/–**चे म.न.पा.चे आर्थिक नुकसान होईल. म्हणुन सन 1994 ते सप्टेंबर 2015 पर्यंत रू. 24,15,891/–चा आर्थिक नुकसानीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित प्रकरणात स्थायी समितीची उपसमिती गठीत करण्यात येते. या समिती मध्ये खालील सदस्य उपसमितीचे सदस्य राहतील.

1. श्री. मुन्नाजी पोकुलवार – सदस्य
2. श्री. सुरेश जग्याशी – सदस्य
3. श्री. अनिल धावडे – सदस्य

या उपसमितीने प्रत्यक्ष मोक्का तपासुन वस्तुनिष्ठ अहवाल एक आठवडयात स्थायी समिती समोर ठेवावा. यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते, अहवाल सादर होईपर्यंत उपरोक्त विषय, विषय पत्रिकेवर स्थगित.

<u>ठराव क्रमांक 541</u>:–
<u>{नगररचना}</u>

मौजा – जरीपटका, सिटी सर्व्हे क्र. 2087/2, नझुल भुखंड क्र. 05 येथील जमिन क्षेत्रावरील विकास योजनेतील टाऊन हॉल (आरक्षण क्र. NW - 87) या आरक्षणा अंतर्गत जमिन क्षेत्र संपादनासाठी बजावलेल्या खरेदी सुचनेबाबत.

नागपूर शहराकरीता मंजुर विकास आराखडयामध्ये नमुद व आवश्यक असलेले ''टाऊन हॉल'' (आरक्षण क्र. NW- 87) चे आरक्षण मौजा – जरीपटका, सिटी सर्व्हे क्र. 2087/2, या जमिनीवरील आरक्षणातंर्गतचे एकुण क्षेत्र – 6144.00 चौ.मी.आहे.

उपरोक्त प्रमाणेच्या आरक्षीत जमिन क्षेत्रावर पुर्व मंजुर बांधकामे व मा. न्यायालयाचे दि. 27.01.2014 चे आदेशानुसार व्यपगत जागा वगळता आरक्षण विकसीत करण्यासाठी उपलब्ध 3570.00 चौ.मी. खुल्या जागेकरीता अंदाजीत **रू. 21,70,61,165/–** ची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. 186 दि. 10.06.2016 चे अन्वये मुख्य अभियंता, महानगरपालिका यांनी 3 सदस्य समिती गठीत केली. या समितीने अहवाल सादर केलेला आहे. याप्रमाणे उपरोक्त 3570.00 चौ.मी. जागेवर साधारणातः 250 व्यक्तींच्या बैठकीची व्यवस्था होवू शकते. तसेच टाऊन हॉलची निर्मीतीकरीता सदर जागा पुरेशी व योग्य आहे. सदर जागेस 12.00 मी. चा पोहोच रस्ता उपलब्ध आहे.

आरक्षित 6144.00 चौ. मी. (आरक्षण क्र. NW-87) टाऊन हॉल या आरक्षणाखालील जागेपैकी मा. उच्च न्यायालयाचे दि. 27.01.2014 चे आदेशान्वये व्यपगत झालेली जागा व पुर्व मंजुर बांधकामे वगळुन उर्वरीत 3570.00 चौ. मी. जागेपैकी पट्टेधारक श्रीमती नगीना हकीमुद्दीन

अकोलावाला (हीराणी) व इतर एक यांच्या नझुल भुखंड क्र. 5/1 पैकी 846.00 चौ.मी. क्षेत्राकरीता बजावलेल्या खरेदी सुचनेचा विचार करता या जागेचा भुसंपादनाकरीता आवश्यक रक्कम रु. 5,14,23,805/— या बाबतच केवळ विचार न करता एकुण आरक्षणाखालील जागेपैकी उपलब्ध मोकळी जागा, क्षेत्र 3570.00 चौ.मी. भुसंपादनाद्वारे संपादीत करणे आवश्यक आहे व याकरीता अंदाजीत एकुण रक्कम रु. 21,70,61,165/— ची राशीची तरतुद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयातील भुसंपादनाकरिता एकूण रक्कम रु. 21,70,61,165/— एवढी तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अनुदानात पुरेशी तरतूद नाही असे कार्यालया मार्फत स्पष्ट केले. करीता याकरीता पुनःसमायोजन प्रस्ताव किंवा सुधारीत अर्थसंकल्पात तरतूद करावी व त्यानंतर उपरोक्त प्रस्ताव रितसर मंजूर करुन घ्यावा, यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 542</u>:— प्रभाग क्र. 26 ब येथील टेकडी रोड सिमेंट कॉंक्रिटचा
{लोककर्म झोन 04} रस्ता तयार करण्यास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 44,70,755/— रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 543</u>:— प्रभाग क्र. 51 तकीया धंतोली येथे बिरसा मुंडा सभागृहाचे
{लोककर्म झोन 04} बांधण्याच्या कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 40,11,621/—रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी तसेच हया कामास्तव म.न.पा. चे नोंदणीकृत वास्तुशिल्पकार एम. बी. मालेवार डिझाईन प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर हयांची नियुक्ती करण्याचा तसेच निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 642(A42901371341) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 544</u>:— अंबाझरी ओव्हरफ्लो पांईन्ट येथिल स्वामी विवेकानंद
{का.अभि. प्रकल्प} स्मारकाचे परिसरात विविध स्टोन वर्क व सौंदर्यीकरणाचे कामाचे निविदेच्या अटीमध्ये तिनपेक्षा कमी निविदाकार आले तरीही निविदा उघडण्याची परवानगी मा. आयुक्तांद्वारे घेण्यात आली आहे. प्राप्त निविदेत एकच निविदाकार मे. एस जे. शर्मा यांची प्राकलनिय दरावरची रू. 72,15,596/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 545</u>:— स्वामी विवेकानंद स्मारक येथे रिटेनिंग वॉल ला स्टॅम्प
{कार्य. अभि.प्रकल्प} कॉंक्रिट करण्याचे कामाचे प्राप्त निविदा मे. श्री. श्याम सिरॅमिक्स प्रा.लि. यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा 0.41% प्रतिशत कमी दराची रू. 41,17,007/— रकमेची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 546</u>:— प्रभाग क्र. 52 अ अंतर्गत झेंडा चौक धरमपेठ ते साकेत
{लोककर्म झोन 02} अपार्टमेंट पर्यत सिमेंट रोडचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में प्रेमचंद राचुमल हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 10.00% टक्के कमी दराची निविदा रूपये 39,64,257/— ( रूपये एकोणचाळीस लक्ष चौसट हजार दोनशे सत्तावन रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 547</u>:— प्रभाग क्र. ६२—अ अंतर्गत महालक्ष्मी नगर येथील
{लोककर्म झोन 03} प्रोसेस मंगळ कार्यालय ते श्री. पराते ते श्री. रोकडे ते श्री. तिनखेडे व रामभाऊ म्हाळगीनगर येथील बालाजी रेस्टॉरेन्ट ते श्री. कनाटे ते श्री. तितरमारे यांचे घरापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.के. गुरूबक्षाणी यांची मुळ प्राकलनीय दराची रू. २९,७४,४४२/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 548</u>:— प्रभाग क्र. ६४—ब अंतर्गत अयोध्यानगर श्रीरामवाडी,
{लोककर्म झोन 03} जम्बोदीपनगर, महालक्ष्मी नगर व सच्चीदानंद नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी. के. नगरारे कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दराची रू. ४९,९३,३८०/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 549</u>:— प्रभाग क्र. २४ (अ) येथील बजरंग सोसायटी दुबे
{लोककर्म झोन 02} ले—आऊट येथिल रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव रु. ४९,८३,२४३/— च्या प्राकलनास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 550</u>:— नेहरूनगर झोन क. 03 व 05 ,मधील हुडकेश्वर व
{विद्युत विभाग} नरसाळा येथील म.रा.वि.वि.कं.लि. व म.न.पा.च्या खांबावर एल.ई.डी. फिटींग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 25,90,500/— च्या प्राकलनास व हे काम ई—निवीदा बोलावून करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 551</u>:— नेहरूनगर झोन क. 05, मधील नरसाळा अंतर्गत 1.
{विद्युत विभाग} स्वागत नगर नरसाळा, 2. चाणक्यपुरम, 3. इंद्र नगर संत गजानन सो., 4. कापसे ले आऊट मैदान, 5. भारत माता नगर निल कमल सो.मैदान 6. भारत माता नगर हनुमान मंदिर नरसाळा, 7.अजिंक्य पार्क हनुमान मंदिर न्यू नरसाळा रोड, 8.सुर्योदय नगर हनुमान मंदिर नरसाळा येथे 12.5/16 मी. उंच हायमास्ट लावून व 1. बॅक कॉलनी टी पॉईट नरसाळा रोड, 2.बुध्द विहार नरसाळा गांव ठान, 3.इंद्र नगर शिव मंदिर मैदान, 4.गगनदिप कॉलनी नरसाळा , 5.इंद्र नगर दुर्गा मंदिर मैदान येथे 9. मी. आक्टॅगोनल पोलवर एलईडी फ्लड लाईट फिटिंग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 37,68,400/— च्या प्राकलनास व हे काम ई—निवीदा बोलावून करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 552:–** **{लोककर्म झोन 04}** प्रभाग क्र. 51 येथील दीक्षाभूमी चौकातील अन्नाभाऊ साठे पुतळयाचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. डी.सी. गुरूबक्षणी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.65 टक्के कमी दराची निविदा रूपये 28,40,694/–( रूपये अठ्ठाविस लक्ष चाळीस हजार सहा शे चौ–यानऊ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे हे काम पद क्रमांक 655 (A46701373516) अंतर्गत प्रस्तावित आहे.

तसेच वास्तु शिल्पकार उमेश पाटील यांचे कडुन प्राकलन तयार करून घेण्यात आलेले आहे त्यांचे कन्सल्टंसी चार्जेस रूपये 96,775/– असे एकुण रू. 28,40,694/– असे एकुण रू. 29,37,469/– तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 553:–** **{लोककर्म झोन 04}** प्रभाग क्र. 66 अ+ब अंतर्गत रामेश्वरी येथील विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. मुकेश कंन्स्ट्रक्शन हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 29,98,999/–( रूपये एकोणतीस लक्ष अठ्ठयानऊ हजार नऊ शे नव्यानऊ रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 682(Fix.Pro.) (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 554 :–** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर